# राजकारण आणि महिला

गोरक्षा डेरे



आज देशात कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात महिला विशेष कामगिरी करत असल्या तरी राजकारणात मात्र पिछाडीवर असलेल्या दिसतात. राजकारणातील पिछाडी भरून काढण्यासाठी आरक्षण ह्या साधनाचा आधार घेतला गेला. १०८ वी घटनादुरुस्ती करणारे विधेयक महिला आरक्षण विधेयक या नावाने परिचित आहे. लोकसभा आणि विधानसभामध्ये १/३ जागा महिलांसाठी आरक्षित कराव्यात, हे आरक्षण चक्राकार पद्धतीने निश्चित करावे. अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखीव असलेल्या जागांपैकी १/३ जागा संबंधित जाती-जमातीतील महिलांसाठी आरक्षित कराव्यात असा हा कायदा होता. हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर १५ वर्षानंतर आरक्षण रद्द करण्यात यावे अशा विविध तरतुदींचा प्रस्ताव या विधेयकाद्वारे मांडण्यात आला आहे. हे विधेयक ६ मे २००८ रोजी राज्यसभेत सादर करण्यात आले आणि ९ मार्च २०१० रोजी या विधेयकाला राज्यसभेने मान्यता दिलेली आहे. पण या विधेयकाला लोकसभेने अजून मान्यता दिलेली नाही .

११२ वे घटनादुरुस्ती विधेयक २४ नोव्हेंबर २००९ मध्ये लोकसभेत मांडण्यात आले होते. यानुसार राज्यघटनेतील कलम २४३ 'टी'मध्ये दुरुस्ती प्रस्तावित आहे. नागरी 'शहरी' स्थानिक संस्थांमध्ये एकूण जागांपैकी आणि अध्यक्षपदाच्या एकूण जागांपैकी ५० टक्के जागा (सध्या १/३) महिलांसाठी आरक्षित करणे, तसेच शहरी स्थानिक संस्थांमध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव असलेल्या जागांमध्ये ५० टक्के प्रतिनिधित्व संबधित जाती जमातीतील महिलांसाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे. हे विधेयक मंजूर झाले असून संसदीय स्थायी समितीकडे परीक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. समितीचे

ईमेल : gorakshadr@gmail.com

अध्यक्ष शरद यादव आहेत. पण या विधेयकास राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष यांचा विरोध आहे.

महिलांसाठी आरक्षण अन्य देशांमध्येही आहे. नेपाळ ३३%, पाकिस्तान २२%, रवांडा ५६%, ऑस्ट्रेलिया २७%, स्वित्झर्लंड २८%, जर्मनी ३३%, स्पेन ३६%, बांगलादेश १४%, फ्रान्स १८.०५%, फिलिपिन्स २१%, ब्रिटन २०% आणि स्वीडनमध्ये ४७% जागा महिलांसाठी राखीव असून अधिकाधिक महिलांनी राजकारणात सक्रिय सहभागी व्हावे असाच प्रयत्न सर्वत्र आहे. १९९०नंतर महिला आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला तेव्हापासून महिलांमध्ये राजकीय जागृती होऊन राजकीय क्षेत्रातील त्यांच्या सहभागाचे प्रमाणही चढत्या क्रमाने वाढलेले दिसते.

महाराष्ट्र स्थानिक राजकीय संस्थांमध्ये ३३% महिलांना आरक्षण लागू करण्यात आघाडीवर होता. पण दुसऱ्या बाजूला २०१४च्या विधानसभेत फक्त १९ महिला असून विधान परिषदेमध्ये ६ महिला आहेत. मात्र स्थानिक राजकारणात महिला ३३ टक्क्यांपेक्षा अधिक संख्येने सहभागी आहेत. महाराष्ट्रात ३३ जिल्हा परिषदा असून तेथे ६७५ महिला निवडून आलेल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या १८ जिल्ह्यात महिला अध्यक्ष आहेत तर ३५१ तालुका पंचायतीत १,३७२ महिला निवडून आलेल्या आहेत. १४८ पंचायत समित्यांच्या सभापती महिला आहेत. ग्रामपंचायतीच्या सदस्य म्हणून ७५,९५० महिला निवडून आलेल्या आहेत. त्यापैकी ९,४४८ अ. जा. महिला आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के महिलांना आरक्षण मिळाल्याने स्थानिक राजकारणातला निर्णयप्रकियेतील महिलांचा सहभाग वाढला असला तरी विधानसभा व लोकसभेतला त्यांचा सहभाग नगण्य असलेला दिसतो. देश व राज्य पातळीवर महिला नेतृत्व वाढण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील डुकरे गावात गेली १५ वर्षे ग्रामपंचायतीचे संपूर्ण पॅनेल महिलांचे आहे. या गावात पक्के रस्ते, नळाद्वारे पाणीपुरवठा, वीज आणि दवाखाने या सोयी महिलांनीच आणल्या आहेत. महिला बहुसंख्येने स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून येत असल्या तरी अनेक ठिकाणी महिलांच्या वतीने पुरुषमंडळीच कामकाज बघतात. यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. तसेच या महिलांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची गरजही पंचायत राजव्यवस्थेने संसदीय समितीने केलेली आहे. गावात दारूबंदी करण्यासाठी ग्रामसभेत ठराव घेण्याऐवजी गावातील २५% महिला जिल्हा उत्पादन शुल्क कार्यालयात थेट निवेदन सादर करू शकणार आहेत. पूर्वी दारूबंदीसाठी ५०% महिलांच्या बहुमताची अट होती.

प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात मुलींचा जन्मदर दिवसेंदिवस कमी होत असल्याने गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. रेशन दुकानांमधील भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी दुकानांचे परवाने महिला बचत गटांना देण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. छत्तीसगड सरकारने विनयभंग करणाऱ्या खाजगी दुकानदारांचे परवाने रद्द करून त्यांची दुकाने महिलांकडे सुपूर्द केली आहेत.


## Form IV

परिवर्तनाचा वाटसरू या पाक्षिक नियतकालिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ | : २६/४, आनंदपार्क, स.नं.१३/४/५, विठ्ठलनगर, आनंदनगर, पुणे ५१ |
| प्रकाशन काळ | : पाक्षिक |
| मुद्रक | : प्रकाश बडगुजर |
| पत्ता | : नर्मदा ऑफसेट, २१४, नारायण पेठ, पुणे ४११०३० |
| प्रकाशक व मालक | : अभय गुलाबचंद कांता |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : एफ-७०४, इटर्निटी कॉंप्लेक्स, तीन हात नाका, ठाणे (प.) ४००६०४ |
| संपादक | : प्रज्ञा दया पवार |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : एफ-७०४, इटर्निटी कॉंप्लेक्स, तीन हात नाका, ठाणे (प.) ४००६०४ |

मी, अभय गुलाबचंद कांता, असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

अभय कांता
प्रकाशक

तसेच महिलांना दुकानासाठी ७० हजार रुपयांचे कर्जही उपलब्ध करून दिले आहे.

केरळ राज्यातील 'पंचायत राज' हे देशातील मॉडेल बनले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात महानगरपालिकेचा अर्थसंकल्प असतो तसाच ग्रामपंचायतींचाही असतो. तिथे अनेक ग्रामपंचायतींवर महिला निवडून आल्या असून ग्रामविकासाचा त्यांचा वाटा मोलाचा आहे. बचतगटांच्या धर्तीवर तेथे 'कुटुंबश्री' हे महिलांचे संघटन सुरू झाले आहे. आज राज्यातील ३७ लाख महिला या अभियानात सहभागी झाल्या आहेत. निराधार व्यक्तींना देण्यात येणारे अर्थसाह्य आता परित्यक्ता महिला, देवदासी व तृतीयपंथीयांनाही मिळणार आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पत्नीस 'संजय गांधी निराधार अनुदान योजनेतून' अर्थसहाय्य मिळणार आहे.

जागतिक राजकारणातही महिलांनी आपल्या कर्तृत्वाने वेगळा ठसा उमटवला आहे. ब्राझीलच्या अध्यक्षपदी दिलमा रौसेफ यांची निवड करण्यात आली. हुकूमशाही राजवटीला विरोध करत कारावास भोगलेल्या दिलमा रौसेफ यांनी ब्राझीलची अ-भांडवलशाही अर्थव्यवस्था अधिक भक्कम करण्याचे आश्वासन दिले आहे. कॅलिफोर्नियाच्या अॅटर्नी जनरलपदावर कमला हॅरिस या भारतीय वंशाच्या महिलेची प्रथमच निवड झाली आहे. तर भारतीय वंशाच्या निकी रंधवा हॅले या दक्षिण कॅरोलिनाच्या राज्यपाल म्हणून निवडून आल्या. त्या अमेरिकेतील पहिल्याच भारतीय वंशाच्या महिला राज्यपाल आहेत.

ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुकीत आशियाई वंशाच्या महिला पहिल्यांदाच संसदेवर निवडून गेल्या आहेत. यात भारतीय वंशाच्या प्रीती पटेल व्हॅलरी वाझ यांच्यासह ब्रिटनमधील पहिल्या मुस्लिम खासदार शबाना महमूद, यास्मिन कुरेशी, रूखसाना अली यांची संसदेत निवड झाली आहे. म्यानमारमधील लष्करी राजवट मोडून काढण्यासाठी सतत संघर्ष करणाऱ्या आँग सान स्यू की यांना २० वर्ष नजरकैद भोगावी लागली संयुक्त राष्ट्र संघटनेनेही त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले होते. २०१० मध्ये म्यानमार सरकारने त्यांची सुटका केली. लोकशाही स्थापनेसाठी लष्करशाहीच्या विरोधात त्यांनी दिलेली झुंज गौरवास्पद आहे. ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे जुलिया गिलार्ड यांनी स्वीकारली आहेत.

पुरुषांचे वर्चस्व असलेल्या राजनय क्षेत्रातही अनेक महिला स्वत:चे कर्तृत्व गाजवत आहेत. अमेरिकेतील विविध देशांच्या १८२ दूतावासांतील २५ दूतावासांच्या प्रमुख राजदूत महिला आहेत हा आतापर्यंतचा विक्रम असल्याचे अमेरिकेच्या परराष्ट्रखात्याने म्हटले आहे.

आज जग एक खेडे बनलेले आहे. या खेड्यातील जागतिकीकरणातही महिलांचे स्थान दुय्यम राहिलेले आहे. कारण या जागतिकीकरणामध्ये उपभोगवादाचीच चलती आहे. त्यामुळेच ८ मार्चचा महिला दिन 'कष्टकरी' स्त्रियांच्या लढ्यातून निर्माण झालेला असला तरी तोही आता सौंदर्यप्रसाधनांच्या बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रायोजित करायला सुरुवात केली आहे. त्याचे मूळ स्वरूप आणि महत्त्व हे 'उत्सवा'च्या आवरणात झाकून टाकले जात आहे. प्रसारमाध्यमातून स्त्रीच्या होणाऱ्या चित्रणातून उपभोगवादाचाच प्रसार होतो आहे. प्रत्येक क्षणी स्त्रीला सुंदर दिसण्याची सक्तीच केली जात आहे. उपभोगवादाच्या या जागतिकीकरणाने स्त्रीचे दुय्यमत्व नाहीसे होणारे नाही. म्हणून गरज आहे ती जगण्याकडे, सामाजिक पर्यावरणाकडे चिकित्सकपणे पाहण्याची. समाजात आपण बदल घडवू शकतो या आत्मविश्वासाची. त्यासाठी आवश्यक असलेल्या वैचारिक मंथनाला चालना देणारी प्रकिया हीच खऱ्या अर्थाने व्यापक जागतिकीकरणाची वाटचाल असेल.

●

**संदर्भ :**

डॉ. भारती पाटील : २०१४, 'स्त्रिया : समाज आणि राजकारण' हर्मिस प्रकाशन, सातारा.

विद्युत भागवत आणि शर्मिला रेगे : २०००, 'भारतातील समकालीन कळीचे प्रश्न : स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा', स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.

P. Manikyamba : Women in Panchayati Raj Structure, New Delhi, Gian,1989.

L. Calman, Toward Empowerment : Women and Movement Politics in India, Boulder Colorado, Westview Press,1992.

S. Kaushik : Women and Panchayati Raj, New Delhi, Har-Anand Publication,1993.

H. Asfah (ed) : Women and Politics in The Third World, London, Routledge,1996.